**संचालक फलोत्पादन**

(कृषि आयुक्तालय)

कृषि भवन जवळ, शिवाजीनगर, पुणे-४११ ००५

**दुरध्वनी क्र.** ०२०-२५५३८०९५/२५५३७९५७ **ई-मेल-**hortplantprotection@rediffmail.com

**फॅक्स नं. ०२०-२५५३७५६५**


पत्र

जा.क्र.कृआ/फलो-३/केळी सिगाटोका/१६-१७/मा.सू./१६४२/१६

कृषि आयुक्तालय, (फलोत्पादन विभाग) महाराष्ट्र राज्य,

पुणे-४११ ००५. दिनांक -०६/०६/२०१६ १७/०६/२०१६

प्रति,

१. **विभागीय कृषि सहसंचालक,**
   नाशिक
२. **जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी,**
   जळगाव, धुळे, नंदुरबार
३. **कृषि विकास अधिकारी,**
   जळगाव, धुळे, नंदुरबार

**विषय :- सन २०१६-१७ मध्ये केळी पिकावरील सिगाटोका (करपा) रोगाचे नियंत्रणाबाबत राबवावयाच्या प्रकल्पाबाबतच्या मार्गदर्शक सूचना.....**

**संदर्भ :-** शासन पत्र क्र. राकृवि ०४१५/प्र.क्र.३९/राकृवियो कक्ष, दिनांक-३०/०४/२०१५

सन २०१२-१३ पासून जळगाव, धुळे व नंदुरबार या जिल्ह्यांमध्ये केळी पिकावरील सिगाटोका रोग नियंत्रणासाठी ४६,५८९ हेक्टर क्षेत्रावर कार्यक्रम राबविण्यात येत आहे. सन २०१६-१७ मध्येही सदर प्रकल्प राबविण्यासाठी उपरोक्त संदर्भान्वये मान्यता मिळालेली आहे. सदर पॅकेजचा कार्यक्रम सन २०१६-१७ मध्ये मागील वर्षाप्रमाणेच माहे जुलै २०१६ ते जानेवारी २०१७ या कालावधीत राबवावयाचा आहे.

**सोबत :- मार्गदर्शक सूचना**

**संचालक फलोत्पादन**
कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य
पुणे- ४११००५

**प्रत माहितीकरीता :-**

१) **मा. अप्पर मुख्य सचिव**, कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई – ३२ यांना माहितीस्तव सविनय सादर.
२) **मा. व्यवस्थापकीय संचालक,** महाराष्ट्र राज्य फलोत्पादन आणि औषधी वनस्पती मंडळ, पुणे-५ यांना माहितीस्तव
३) **कृषि सहसंचालक, नियोजन,** कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे – १ यांना माहितीकरीता.

## Integrated Management of control of Leaf blight Disease (Sigatoka) of Banana 2016-17

# Guidelines

## केळी पिकावरील सिगाटोका (करपा) रोगाचे नियंत्रण कार्यक्रम सन २०१६-१७

# मार्गदर्शक सूचना

**१. पॅकेजचे स्वरुप :**

**१.१** केळी पिकावरील सिगाटोका (करपा) रोगाचे नियंत्रणासाठी उद्यानविद्यावेत्ता, केळी संशोधन केंद्र जळगाव यांचेमार्फत रु. २५,६५७/- चे पॅकेज तयार करण्यात आले असून, ते **प्रपत्र-२** मध्ये दिलेले आहे. तयार केलेल्या पॅकेजमध्ये १) क्षेत्र व्यवस्थापन (Field Management), २) कंद उपचार (Sucker Treatment), ३) फवारणी कार्यक्रम (Foliar Spray), ४) फवारणी खर्च (Spraying Charges), ५) मोहिम व्यवस्थापन (Campaign Management) इत्यादी घटकांचा समावेश करण्यात आलेला आहे.

**१.२** मोहिम व्यवस्थापन या घटकांतर्गत जनजागृती करण्याच्या दृष्टीने प्रतिहेक्टरी रु.६५७/- इतका खर्च अपेक्षित असून त्यामध्ये करावयाच्या बाबी खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | बाब |
|---|---|
| १. | जनजागृती मोहिम (घडीपत्रिका, भित्तीपत्रिका, माहितीपत्रके, पुस्तिका छपाई इत्यादी प्रकाशित करणे. |
| २. | शेतकरी प्रशिक्षण (१ दिवस) - रु. १५०/- प्रतिदिवस प्रतिशेतकरी प्रशिक्षण |
| ३. | शेतकऱ्यांचे प्रशिक्षण (२ दिवस) - रु. २५०/- प्रतिदिवस प्रतिशेतकरी प्रशिक्षण |
| ४. | शेतकऱ्यांच्या शेतीशाळा - रु. ३५,०००/- प्रति शेतीशाळा |
| ५. | २ ते ४ केळी समूहासाठी १ क्षेत्रीय सहायकाची नियुक्ती, रु.१०,७२०/- प्रति क्षेत्रीय सहायक |
| ६. | अनुभवी चमूकडुन प्रकल्पाची अंमलबजावणी |

**१.३** केळी पिकावरील सिगाटोका (करपा) रोगाचे नियंत्रण कार्यक्रमासाठी प्रतिहेक्टरी रु.२५,६५७/- इतका खर्च अपेक्षित आहे. त्यापैकी पॅकेज अंमलबजावणीसाठी रु.२५,०००/- व जनजागृती कार्यक्रमासाठी रु.६५७/- असा खर्च राहणार आहे.

**२. जनजागृती मोहिम :**

**२.१** प्रकल्प कार्यान्वित करण्यासाठी जनजागृती करण्याच्या दृष्टीने घडीपत्रिका, भित्तीपत्रके, माहितीपत्रके, पुस्तिका छपाई करुन त्यामध्ये प्रकल्पाची माहिती, राबविण्यात येणारे पॅकेज, करावयाची कार्यवाही याबाबतची माहिती तयार करुन त्यास प्रसिध्दी द्यावी. केळी लागवड करणाऱ्या शेतकऱ्यांची फोन नंबरसह यादी तयार करावी. उद्यानविद्यावेत्ता, केळी संशोधन केंद्र, जळगाव यांनी केळी पिकावरील सिगाटोका रोगाचे नियंत्रणासाठी शास्त्रीय / वस्तुनिष्ठ आधार घेऊन पॅकेजमधील बाबींप्रमाणे तांत्रिक माहिती तयार करावी . सदर माहितीच्या आधारे घडीपत्रिका, भित्तीपत्रके, पुस्तिका, जिंगल्स इत्यादी प्रशिक्षण साहित्य तयार करावेत. सदर जनजागृती कार्यक्रम मोठ्या प्रमाणवर राबविण्यात यावा. जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, जळगाव यांनी ४३,०००, जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, नंदुरबार यांचेकरीता ५,००० व जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, धुळे यांचेकरीता २,००० अशी एकूण ५०,००० घडीपत्रिकांची छपाई त्यांनी स्वतः करुन प्रत्येक केळी उत्पादक गावात शेतकऱ्यांना त्याचे वाटप करावे. त्याचप्रमाणे

भित्तीपत्रके छपाई करुन प्रत्येक गावात प्रमुख ४ ते ५ दर्शनी ठिकाणी करावीत. उपरोक्तप्रमाणे सर्व कार्यवाही १५ दिवसात पूर्ण करावी.

२.२ हा प्रकल्प समूह पध्दतीने व मोठ्या प्रमाणावर राबवावयाचा असल्याने त्याकरीता केळी उत्पादक संघाचे पदाधिकारी, खाजगी कपन्यातील केळीतज्ञ, कृषि विद्यापीठातील तसेच केळी संशोधन केंद्रातील शास्त्रज्ञ, कृषि विभागातील अधिकारी, महाराष्ट्र कृषि उद्योग विकास महामंडळाकडील विभागीय अधिकारी यांची जिल्हास्तरावर तात्काळ बैठक आयोजीत करुन त्यामध्ये कार्यवाहीची रुपरेषा ठरवावी व शासनाने मंजुर केलेल्या प्रकल्पाबाबत माहिती द्यावी.

२.३ सदर प्रकल्प यशस्वीपणे राबविण्यासाठी जुलैच्या पहिल्या पंधरवड्यात जिल्हा पातळीवर कृषि विभागातील अधिकारी / कर्मचाऱ्यांची कार्यशाळा आयोजीत करावी. सदर कार्यशाळेस क्षेत्रीय स्तरावरील सहायक, कृषि पर्यवेक्षक, कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी, तंत्र अधिकारी, कृषि उपसंचालक, उपविभागीय कृषि अधिकारी, केळी उत्पादक शेतकरी, केळी उत्पादक संघाचे पदाधिकारी व कृषि विद्यापीठ आणि केळी संशोधन केंद्रातील शास्त्रज्ञ यांना निमंत्रित करावे.

२.४ केळी पिकावरील सिगाटोका रोगाच्या नियंत्रणासाठी संबंधित जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी कृषि विद्यापीठ व केळी संशोधन केंद्राच्या सहकार्याने मंडळनिहाय, गावनिहाय प्रशिक्षणाचे वेळापत्रक तयार करावे व त्याप्रमाणे अंमलबजावणी करावी. त्याची एक प्रत कृषि आयुक्तालयास सादर करावी. डॉ. गोरखसिंग, आयुक्त फलोत्पादन, भारत सरकार यांचे अध्यक्षतेखली ०४.०४.२०११ रोजी घेतलेल्या सभेमध्ये सिगाटोका रोगाचे नियंत्रणासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणून केळीची लागवड जुन आणि ऑक्टोंबर महिन्यामध्ये करणे, शिफारशीप्रमाणे लागवड करणे, सेंद्रिय खतांचा वापर शिफारशीप्रमाणे करणे, किड रोगाचे नियंत्रणासाठी पिकांचे फेरपालट करणे, पावसाळ्यापूर्वी बुरशीनाशकांची फवारणी करणे इत्यादी शिफारशी केलेल्या आहेत. सदर शिफारशींचा अवलंब करण्याबाबत प्रशिक्षणामध्ये मार्गदर्शन करावे. केळी पिकावरील सिगाटोका रोगाच्या नियंत्रणासाठी पॅकेजची अंमलबजावणी करण्यासाठी जनजागृती कार्यक्रम मोठ्या प्रमाणावर हाती घेण्यात यावा, त्यामध्ये माहितीपत्रिका, घडीपत्रिका, जिंगल्स इत्यादी तयार करण्यात येऊन त्याद्वारे शेतकऱ्यांना मार्गदर्शन करावे. प्रशिक्षणासाठी लागणारे संपूर्ण साहित्य, प्रशिक्षण पुस्तिका(Modules) उद्यानविद्यावेत्ता, केळी संशोधन केंद्र, जळगाव यांनी तयार करुन प्रशिक्षणार्थींना वितरीत करायचे आहे.

जिल्हानिहाय शेतकरी प्रशिक्षण कार्यक्रम व शेतीशाळा राबविण्याचा कार्यक्रम **प्रपत्र-३** मध्ये सहपत्रित केलेला आहे.

२.५ गावनिहाय प्रकल्प मोहिम राबविण्याच्या तारखा निश्चित करुन त्याप्रमाणे फवारणीचा कार्यक्रम राबवावा. सदर गावनिहाय कार्यक्रमामध्ये शेतकऱ्यांमध्ये जागृती निर्माण करुन केळी पिकावर सिगाटोका रोग येणार नाही व मंजुर असलेले पॅकेज पुर्णपणे राबविण्याबाबत शेतकऱ्यांची मानसिकता तयार करण्याच्या दृष्टीने कार्यवाही करण्यात यावी.

**३. आऊटसोर्सिंगद्वारे सेवा उपलब्धता:-**

प्रकल्पांतर्गत आवश्यक कंत्राटी मनुष्यबळ नोंदणीकृत मनुष्यबळ सेवा पुरवठा करणाऱ्या ठेकेदारांकडून आऊटसोर्सिंगद्वारे उपलब्ध करुन घ्यावे. मनुष्यबळ सेवा पुरवठा करणाऱ्या ठेकेदारांच्या नियुक्तीसाठी विभाग स्तरावर विभागीय कृषि सहसंचालक यांनी विहित पद्धतीने निविदा प्रक्रिया पार पाडावी. यासाठी प्रथमतः जिल्ह्याच्या ठिकाणी सहाय्यक कामगार आयुक्त/शासकीय कामगार अधिकारी यांचेकडे कंत्राटी कामगार (नियंत्रण आणि निर्मुलन) अधिनियम, १९७० अंतर्गत ठेकेदारांनी स्वतःची प्रिन्सिपल ऍम्पलॉयर म्हणून नोंदणी अद्ययावत करावी. निविदा प्रक्रियेनुसार निश्चित केलेल्या सदर ठेकेदारांना त्यांचेमार्फत उपलब्ध करुन दिलेल्या कामगारांच्या मानधनाच्या जास्तीत जास्त ५ टक्के पर्यंत सेवा आकाराची रक्कम (Service Charges) अदा करावी.

याबाबतचा निविदा प्रक्रियेनुसार योग्य निर्णय विभागस्तरावर घेण्यात यावा. हॉर्टसॅप अंतर्गत कंत्राटी मनुष्यबळाचे वेतन किमान वेतन कायदा नुसार "शेतकी कामधंदा" या अंतर्गत संस्थात्मक शेतीसाठी लागू असलेल्या वेतन दराप्रमाणे निश्चित केले जाते. याबाबत उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाने दिनांक-८/८/२०१४ च्या अधिसुचनेद्वारे सुधारीत किमान वेतन दर जाहीर केले आहेत. सदर बदलांच्या अनुषंगाने निविदेसोबतच्या लिफापा क्र. २ मध्ये प्रकल्पांतर्गत कार्यरत कामगारांचे वेतन व ठेकेदाराच्या सेवा आकाराच्या दरांमध्ये बदल करावा. सदरच्या प्रकल्पांतर्गत क्षेत्रिय सहाय्यकांच्या सेवा महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्राकडून उपलब्ध करुन घ्याव्यात. कंत्राटी कर्मचाऱ्यांची निवड प्रक्रिया विभागीय स्तरावर संबंधीत विभागीय कृषि सहसंचालक यांच्या समन्वयाने महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र यांचेकडून करण्यात यावी. कंत्राटी पद्धतीने ४५ दिवसांपेक्षा जास्त कालावधीसाठी मनुष्यबळाची नियुक्ती करताना आरक्षण अधिनियम २००४ मधील अनुक्रमांक ३ (१) (ग) नुसार अनुसुचित जाती, अनुसुचित जमाती (विमुक्त जाती), भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग आणि नागरिकांचा इतर मागासप्रवर्ग यांमधील व्यक्तिंसाठी लोकसेवेमधील व पदाकरीता रिक्त जागांचा संबंधीत विभागीय कृषि सहसंचालक यांनी प्रवर्गनिहाय मनुष्यबळाचा तपशिल महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र यांना कळवावा. त्याप्रमाणे महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र कर्मचाऱ्यांची निवड करुन संभागासाठी निश्चित केलेल्या मनुष्यबळ संख्येच्या अधिन राहुन मनुष्यबळ पुरवठा करेल. विभागीय कृषि सहसंचालक यांनी चालू वर्षीच्या उत्पादनक्षम क्षेत्रानुसार क्षेत्रिय सहाय्यक यांचे कार्यक्षेत्र ठरवावे व त्याप्रमाणे नेमणुका कराव्यात. निवड यादीनुसार हजर झालेल्या कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या वेतनाची रक्कम संबंधीत विभागीय कृषि सहसंचालक यांनी महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र यांचेकडे वर्ग करावी. संबंधीत कर्मचाऱ्यांच्या हजर अहवालानुसार त्यांच्या वेतनाची रक्कम संबंधीतांच्या बँक खात्यामध्ये महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र यांचेकडून वर्ग करण्यात येईल. मनुष्यबळ उपलब्धतेच्या अनुषंगाने त्यांचा सेवा आकार म्हणून प्रत्येक कर्मचाऱ्याच्या एका महिन्याच्या वेतनाच्या पन्नास टक्के इतकी रक्कम एकदाच त्यांना अदा करावी. यासंबंधीत करारनामा संबंधीत विभागीय कृषि सहसंचालक व महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र यांचे दरम्यान विभागस्तरावर करावा.

याबाबत यदाकदाचीत काही अडचणी उद्भवल्यास प्रकल्पांतर्गत आवश्यक मनुष्यबळ नोंदणीकृत मनुष्यबळ सेवा पुरवठा करणाऱ्या ठेकेदारांकडून आऊटसोर्सिंगद्वारे उपलब्ध करुन घ्यावे त्यासाठी मनुष्यबळ सेवा पुरवठा करणाऱ्या ठेकेदारांच्या नियुक्तीसाठी विभागीय स्तरावर विभागीय कृषि सहसंचालकांनी विहीत पद्धतीने निविदा प्रक्रिया पार पाडावी. यासाठी प्रथमतः जिल्ह्याच्या ठिकाणी सहाय्यक कामगार आयुक्त/शासकीय कामगार अधिकारी यांचेकडे कंत्राटी कामगार (नियंत्रण आणि निर्मूलन) अधिनियम, १९७० अंतर्गत ठेकेदाराने स्वतःचा प्रिन्सिपल ऍम्पलॉयर म्हणून नोंदणी अद्ययावत करावी. निविदा प्रक्रियेनुसार निश्चित केलेल्या सदर ठेकेदारांना त्यांचेमार्फत उपलब्ध करुन दिलेल्या कामगारांच्या मानधनाच्या जास्तीत जास्त ५ ते १५टक्के पर्यंत सेवा आकाराची रक्कम (Service Charges) अदा करावी. याबाबतचा निर्णय विभागस्तरावर निविदा प्रक्रियेनुसार घेण्यात यावा.

खाजगी ठेकेदाराकडून आऊटसोर्सिंगद्वारे सेवा उपलब्ध करावयाच्या क्षेत्रिय सहाय्यकांसाठी निविदा प्रक्रिया राबविणे व त्यांच्या सेवा उपलब्ध करुन सदर प्रकल्पासाठी उपयोगात आणण्याची संपूर्ण कार्यवाही विभागीय कृषि सहसंचालक यांनी करावी. कंत्राटी पद्धतीने राबवावयाच्या निविदा प्रक्रिया व कर्मचारी नियुक्तीबाबत भविष्यात उद्भऊ शकणाऱ्या समस्या टाळण्यासाठी निविदा निश्चिती करण्याच्या समितीमध्ये विभागस्तरावरील संबंधीत जिल्ह्याच्या सहाय्यक कामगार आयुक्त/शासकीय कामगार अधिकारी कार्यालयातील जाणकार व जबाबदार अधिकारी यांचा समावेश करावा. कंत्राटी पद्धतीने राबवावयाच्या निविदा प्रक्रिया व कर्मचारी नियुक्तीबाबत या संबंधीचे कायदे/अधिनियम, उदा. इंडस्ट्रियल डिस्प्यूट ॲक्ट, १९४, महाराष्ट्र रेकगनिशन ऑफ ट्रेड युनियन्स ॲन्ड प्रिव्हेंशन ऑफ अनफेअर लेबर प्रेक्टिसेस ॲक्ट, १९७१, इंडस्ट्रियल एम्पलॉयमेंट (स्टँडींग ऑर्डर्स) ॲक्ट, १९४६, बॉम्बे इंडस्ट्रियल एम्पलॉयमेंट (स्टँडींग ऑर्डर्स) रुल्स, १९५९, बॉम्बे इंडस्ट्रियल एम्पलॉयमेंट (स्टँडींग ऑर्डर्स)

रुल्स, १९५९ अंतर्गत मॉडल स्टँडींग ऑर्डर्स, बॉम्बे शॉप्स ॲन्ड एस्टॅब्लीशमेंट्स ॲक्ट, १९४८, इत्यादींचा अभ्यास करुनच पुर्णतः हंगामी स्वरुपात नियुक्ती करावी. कंत्राटी पद्धतीने ४५ दिवसांपेक्षा जास्त कालावधीसाठी मनुष्यबळाची नियुक्ती करताना "आरक्षण अधिनियम २००४" मधील अनुक्रमांक ३ (१) (ग) नुसार अनुसुचित जाती, अनुसुचित जमाती (विमुक्त जाती), भटक्या जमाती, विशेष मागस प्रवर्ग आणि नागरिकांचा इतर मागासवर्ग यांमधील व्यक्तिंसाठी लोकसेवांमधील व पदाकरीता रिक्त जागांच्या आरक्षणाकरीता आणि तत्संबंधीत व तदनुषंगीक बाबींसाठी असलेल्या तरतुदींच्या अनुषंगाने आरक्षण अधिनियमानुसार विभागीय कृषि सहसंचालक यांनी प्रवर्गनिहाय मनुष्यबळ उपलब्ध करुन घ्यावे. तसेच, याबाबत आवश्यकतेनुसार गरज भासल्यास कायदेशीर सल्लागाराचा सल्ला घेण्यात यावा व यासाठीचा खर्च आकस्मिक निधीतून करावा. मनुष्यबळाच्या सेवा पुरविणाऱ्या ठेकेदारांची कार्यपद्धती व आऊटसोर्सिंगद्वारे उपलब्ध करुन घेतलेल्या मनुष्यबळाच्या सेवांचे नियमन व वेतन वितरण कार्यपद्धती मुद्दा क्र. ९ प्रमाणे राहिल. मनुष्यबळ सेवा पुरवठा करणाऱ्या संस्थेमार्फत नियुक्त करण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांसोबत पत्रव्यवहार करताना, क्षेत्रिय अधिकाऱ्यांनी थेट कर्मचाऱ्यांशी पत्रव्यवहार न करता संस्थेमार्फत करावा. तसेच, कामाचा अनुभव किंवा उल्लेखनीय काम केल्याबाबतचे प्रशस्तीपत्रक थेट कर्मचाऱ्यांना देण्यात येऊ नये. सदर निवड व पदस्थापनेची प्रक्रिया ३० जून, २०१६ पुर्वी करण्यात यावी. मनुष्यबळ उपलब्ध होण्यासाठी मागावावयाच्या निविदेतील अटीशर्ती पुढीलप्रमाणे असतील.

३.१. **केळी पिकावरील करपा (सिगाटोका) रोग नियंत्रण कार्यक्रमाकरीता कृषि क्षेत्रातील कुशल व अर्धकुशल कामगारांच्या सेवा उपलब्धतेबाबत राबवावयाच्या निविदासाठीच्या सर्वसाधारण अटी व शर्ती :-**

३.१.१. नोंदणीकृत / परवानाधारक मनुष्यबळाच्या सेवा पुरवठादार ठेकेदारांकडून मोहोरबंद निविदा मागविण्यात येत आहेत.

३.१.२. नोंदणीकृत / परवानाधारक मनुष्यबळाच्या सेवा पुरवठादार ठेकेदाराची निविदा मंजूर झाल्यास त्या ठेकेदाराकडे कंत्राटी कामगार (नियंत्रण आणि निर्मूलन) अधिनियम, १९७० अंतर्गत संबंधीत जिल्ह्यासाठी २० किंवा त्यापेक्षा जास्त कामगार संख्या असल्यास अशा ठिकाणी नोंदणी परवाना असणे आवश्यक आहे. परवाना नसल्यास, तो परवाना पंधरा दिवसात प्राप्त करुन घेणे बंधनकारक राहील.

३.१.३. विभागीय कृषि सहसंचालक यांना १५ जुलै, २०१६ ते ३१ जानेवारी, २०१७ पर्यंत कालावधीनुसार आवश्यक संख्येप्रमाणे मासिक वेतनावर कुशल/ अर्धकुशल मनुष्यबळाची आवश्यकता आहे.

३.१.४. कंत्राटी पद्धतीने ४५ दिवसांपेक्षा जास्त कालावधीसाठी मनुष्यबळाची नियुक्ती करताना आरक्षण अधिनियम २००४ मधील अनुक्रमांक ३ (१) (ग) नुसार अनुसुचित जाती, अनुसुचित जमाती (विमुक्त जाती), भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग आणि नागरिकांचा इतर मागासवर्ग यांमधील व्यक्तिंसाठी लोकसेवांमधील व पदाकरीता रिक्त जागांच्या आरक्षणाकरीता आणि तत्संबंधीत व तदनुषंगीक बाबींसाठी असलेल्या तरतूदींच्य अनुषंगाने आरक्षण अधिनियमानुसार संबंधीत मनुष्यबळ सेवा ठेकेदाराने विभागीय कृषि सहसंचालक यांच्या मागणीनुसार प्रवर्गनिहाय मनुष्यबळ उपलब्ध करुन देणे आवश्यक राहील.

३.१.५. इच्छुक मनुष्यबळ सेवा पुरवठादार ठेकेदाराने क्षेत्रिय सहाय्यक यांना रु. ४६८०/- इतके मुळ मासिक वेतन, कामगार कायद्याप्रमाणे निश्चित असलेल्या घरभाडे भत्ता, रजा रोखीकरण, लाभांश यांचेसह रु. १५००/- इतका मासिक प्रवास भत्ता यांच्या आधारावर टक्केवारीमध्ये सेवा आकाराचे (Service Charges) दर राहतील. घर भाडे भत्ता, कामगार भविष्य निर्वाह निधी, राज्य कामगार विमा, सेवा कर, रजा रोखीकरण, लाभांक्ष इत्यादी कामगार कायद्याप्रमाणे निश्चित केले असून निविदे सोबतच्या प्रपत्रात दर्शविण्यात येतील. क्षेत्रिय सहाय्यक यांच्या जबाबदाऱ्या व कामाच्या ठिकाणाबाबत निविदेतील तपशिलाचे अवलोकन करुन त्यानुसार सेवा आकाराचे दर नमुद करावेत. पुरवठा करण्यात येणाऱ्या

मनुष्यबळाच्या बाबतीत प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष संपुर्ण:त दायित्व संबंधीत मनुष्यबळ सेवा ठेकेदाराचे असेल.

३.१.६. मनुष्यबळ सेवा पुरवठादार ठेकेदाराकडून ही सेवा पुरविण्यासाठी कळविण्यत आलेल्या सेवा आकाराच्या दराचा (Service Charges) विचार निविदा मंजुरीबाबत निर्णय घेण्यासाठी करण्यात येईल.

३.१.७. निविदे बरोबर रु. २५,०००/- (अक्षरी रुपये पंचवीस हजार मात्र) इतक्या अनामत/बयाणा/इसारा रकमेचा धनाकर्ष नसल्यास निविदा पात्र ठरणार् नाही.

३.१.८. निविदा अर्जाची नापरतावा रक्कम रु. ५००/- (अक्षरी रुपये पाचशे मात्र) इतकी असेल.

३.१.९. संबंधीत सेवा करार कालावधी ६ महिने इतका असेल.

३.१.१०. मनुष्यबळ सेवा पुरवठादारांकडून कंत्राटी पद्धतीच्या कामगार कायद्याची (Contract Labour Act) पूर्तता झाली आहे. याची खात्री करण्यासाठी त्यांनी यापुर्वीच्या एक वर्षातील केलेल्या कामाचा तपशिल जोडणे आवश्यक राहील.

३.१.११. मनुष्यबळ सेवा पुरवठादार ठेकेदारांकडून याबाबतीत लागू असलेल्या अन्य कामगार कायद्यांची पूर्तता करणे आवश्यक राहील.

३.१.१२. मनुष्यबळ सेवा पुरवठादार ठेकेदाराकडे भविष्य निर्वाह निधी खात्याकडे नोंदणीबाबत कोड नंबर, सेवा कर, व्यवसाय कर, लागू असेल तेथे राज्य कामगार विमा योजनेचा कोड नंबर अथवा कामगार भरपाई कायद्यानुसार (Workmen's Compensation Act) विमा पॉलिसी नंबर असणे आवश्यक आहे. निविदेसोबत वरील बाबींच्या प्रमाणित प्रती जोडाव्यात.

३.१.१३. मनुष्यबळ सेवा पुरवठादार ठेकेदाराची मागील दोन वर्षातील आर्थिक उलाढाल/लेखा व्यवहार सनदी लेखापालाकडून प्रमाणित करण्यात आलेले असावेत.

३.१.१४. मनुष्यबळ सेवा पुरवठार.दार ठेकेदाराने शासकीय / निमशासकीय किंवा नामांकीत संस्थांना विविध प्रकारचे मनुष्यबळ उपलब्ध करुन देत असलेबाबत कमीत कमी दोन वर्षाच्या अनुभवाचा पुरावा जोडावा.

३.१.१५. मनुष्यबळ सेवा पुरवठादार ठेकेदारास कंत्राट देण्यापूर्वी संबंधीत मनुष्यबळ सेवा पूरवठादाराकडून कर्तव्यपालनाबाबत रु. १,००,०००/- (अक्षरी रुपये एक लाख) इतक्या अनामत रकमेची बँक हमी देणे आवश्यक आहे. सदर ठेकेदाराने बँक हमी दिल्यानंतर त्या ठेकेदारास अनामत/बयाणा/इसारा रक्कम परत करण्यात येईल व सदर बँक हमी संपूर्ण कंत्राटी कालावधी यशस्वीरित्या पूर्ण झाल्यानंतर मुद्या क्र. ३.१.१६, ३.१.१७ तसेच, याबाबतीत आवश्यक अभिलेखांची पडताळणी केल्यानंतर परत करण्यात येईल. वरीलप्रमाणे द्यावयाची बॅक हमी लेखा अधिकारी, विभागीय कृषि सहसंचालक यांचे नावे देण्यात यावी.

३.१.१६. मनुष्यबळ सेवा पुरवठादारास देय असलेली रक्कम राज्य/केंद्र सरकारच्या वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या विविध नियमांच्या अधिन असलेल्या कर/उपकाराची वजावट तसेच, महिना अखेर सोपविण्यात आलेल्या कामाची पूर्तता केल्यानंतर देण्यात येईल.

३.१.१७. मनुष्यबळ सेवा पुरवठादार ठेकेदारास केंद्र व राज्य शासनाकडून कामगार कायद्याअंतर्गत वेळोवेळी ठरविले जाणारे सेवा कर, उत्पन्न कर, निर्वाह निधी, कंपनी कायदा कर व्यवसाय कर व इतर अतिरिक्त कर वजावटीचे दायित्व, कर्मचारी कल्याण व इतर अनुषंगिक जबाबदाऱ्या की ज्या इथे नमूद केलेल्या नाहीत त्या सर्व बाबी पार पाडणे बंधनकारक आहे. याबाबतच्या कायद्यांचे पालन करण्याची सर्वस्वी जबाबदारी ठेकेदाराची राहील. याबाबतीत संबंधीत ठेकेदाराकडून प्रत्येक महिन्याला पालन केले जाईल याची खात्री देण्यात यावी.

३.१.१८. सदर ठेकेदाराने संबधीत कामगारांना दिलेल्या वेतनाची नोंद स्वतंत्ररित्या ठेवली पाहिजे याबाबत मुंबई दुकाने व संस्था अधिनियम, १९४८ अंतर्गत नियमानुसार पगारपत्रक/हजेरीपत्रक (Muster Roll Cum

Wage Register) ठेवले पाहिजे. कामगार कायद्याप्रमाणे कामगारांचे नावे जमा करावयाच्या कामगार भविष्य निर्वाह निधी, लागू असेल तेथे राज्य कामगार विमा रक्कम अथवा कामगार भरपाई कायद्यानुसार (Workmen's Compensation Act) विमा पॉलिसी रक्कम, सेवा कर, व्यवसाय कर व इतर रकमा संबंधीत महिन्यात चलनाने भरणे बंधनकारक आहे. सदर रकम्मा भरवल्या चलनाच्या प्रमाणित प्रती, मुंबई दुकाने व संस्था अधिनियम, १९४८ अंतर्गत नियमानुसार पगारपत्रक/हजेरीपत्रकाची (Muster Roll Cum Wage Register) प्रमाणित प्रत व इतर माहिती संबंधीत जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी व विभागीय कृषि सहसंचालक यांना सादर करणे बंधनकारक राहील. तसेच, याबाबत कृषि आयुक्तालयाने मागणी केल्यास उपलब्ध करुन देणे बंधनकारक राहील.

३.१.१९. प्रत्येक महिन्याच्या एक तारखेपर्यंत मनुष्यबळ सेवा पुरवठादार ठेकेदाराने कामगारांचा उपस्थिती अहवाल, मुंबई दुकाने व संस्था अधिनियम, १९४८ अंतर्गत नियमानुसार पगारपत्रक/हजेरीपत्राकाची (Muster Roll Cum Wage Register) प्रमाणित प्रतीसह कामगारांचे वेतन देयक (शासकिय वजावटीच्या तपशिलासह) व मनुष्यबळ सेवा पुरवठादार ठेकेदाराचे सेवा आकाराचे देयक अशी दोन स्वतंत्र देयके तसेच, मुद्दा क्र. ३.१.१६ व ३.१.१७ मध्ये नमुद केलेल्या रकमा चलनाने भरल्याच्या प्रमाणित प्रती (मागील महिन्याच्या) जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांना सादर कराव्यात. मनुष्यबळ सेवा पुरवठादार ठेकेदाराकडून सादर करण्यात आलेला उपस्थिती अहवाल, वेतन देयक, मुंबई दुकाने व संस्था अधिनियम, १९४८ अंतर्गत नियमानुसार पगारपत्रक/हजेरीपत्रकाची (Muster Roll Cum Wage Register) प्रमाणित प्रत व मागील महिन्यात भरणा केलेल्या चलनाच्या प्रमाणित प्रतींची तपासणी व पडताळणी उपविभागीय कृषि अधिकारी यांच्या अहवाल व हजेरीपत्राआधारे जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांचेकडून करण्यात येईल व त्यानुसार संबंधीत मनुष्यबळ सेवा पुरवठादार ठेकेदारास दहा तारखेपर्यंत देयक अदा करण्यात येईल. प्रकल्पाअंतर्गत पुरवठा केलेल्या कामगारांच्या नावे जमा करावयाच्या कामगार भविष्य निर्वाह निधी, लागू असेल तेथे राज्य कामगार विमा रक्कम अथवा कामगार भरपाई कायद्यानुसार (Workmen's Compensation ACT) विमा पॉलिसी रक्कम, सेवा कर, व्यवसाय कर व इतर रक्कमा प्रकल्पाकरीता स्वतंत्र चलनाद्वारे भरणे आवश्यक राहील व त्याची यादी व तपशिल देयकासोबत दर्शविणे आवश्यक राहील.

३.१.२०. मनुष्यबळ सेवा पुरवठादार ठेकेदाराकडून संबंधीत कंत्राटी कामगारांचे वेतन त्यांच्या बँक खात्यामध्ये जमा करण्यात येईल.

३.१.२१. वेतन अदायगीच्या विवादाबद्दल अथवा इतर विवादांमुळे कामगारांना वेतन दिले न गेल्यास मनुष्यबळ सेवा पुरवठादार ठेकेदारास देय असलेली रक्कम विभागीय कृषि सहसंचालक यांच्या तडजोडीनंतर किंवा संबंधीत प्राधिकरणाच्या आदेशानंतर अदा करण्यात येईल. सदर विवाद मिटविण्याची सर्वस्वी कायदेशीर जबाबदारी संबधीत मनुष्यबळ सेवा पुरवठादार ठेकेदारांची राहील. त्याबाबत न्यायालयीन प्रकरणे,कायदेशीर प्रक्रिया यास सदर ठेकेदार जबाबदार राहील.

३.१.२२. मनुष्यबळ सेवा पुरवठादार ठेकेदाराकडून उपलब्ध करुन देण्यात येणाऱ्या कोणत्याही कामगाराच्या बाबतीत निर्माण होणाऱ्या कोणत्याही विवादाची पुर्णतः जबाबदारी संबधीत मनुष्यबळ सेवा पुरवठादार ठेकेदाराची असेल तसेच, मनुष्यबळ सेवा पुरवठादार ठेकेदाराकडून नियुक्त केलेले कामगार हे पुर्णपणे संबंधीत ठेकेदाराचे राहतील त्यांच्या शासकीय सेवेशी कोणत्याही संबंध असणार नाही. तसेच, त्यांना शासनाकडून या सेवा नियमित करणेबाबत कोणताही हक्क सांगता येणार नाही याची मनुष्यबळ सेवा पुरवठादार ठेकेदाराने संबंधीत मनुष्यबळाला लेखी स्वरुपात कल्पना देणे व याबाबत त्यांची लेखी संमती त्यांचे स्वाक्षरीने घेणे बंधनकारक आहे.

३.१.२३. ठेकेदाराने संबधीत कामगारास तो करीत असलेल्या कर्तव्य कालावधीत होणाऱ्या अपघाताच्या जोखमीची खात्री देणे आवश्यक आहे. पूरवठा करण्यात आलेल्या कामगारांना होणाऱ्या कोणत्याही प्रकारच्या इजा, अपघाताची सर्वस्वी जबाबदारी संबंधीत ठेकेदाराची राहील, शासनाची राहणार नाही.

३.१.२४. कोणत्याही कामगारास झालेल्या इजेबाबत, अपघाताबाबत वा आजाराबाबत कोणत्याही प्रकारच्या भरपाईचे संपूर्ण दायित्व संबंधीत मनुष्यबळ सेवा पुरवठा ठेकेदाराचेच असेल. कामगारांना लागू असेल तेथे राज्य कामगार विमा अथवा कामगार भरपाई कायद्यानुसार (Workmen's Compensation ACT) विमा संरक्षण ठेकेदाराने देणे बंधनकारक आहे.

३.१.२५. आवश्यकता वाटल्यास, विभागीय कृषि सहसंचालक ठरवून देतील तो व मनुष्यबळ सेवा पुरवठादार ठेकेदाराकडून पुरवण्यात येणारा गणवेश संबंधीत कामगाराने त्याच्या नावासह परीधान करणे आवश्यक आहे. यामध्ये कसूर केल्यास त्या कामगाराचे संबंधीत दिवसाचे वेतन कपात करण्यात येईल.

३.१.२६. मनुष्यबळ सेवा पुरवठादार ठेकेदाराने विविध कामगार कायद्याअंतर्गत विहीत अभिलेख, दैनंदिन उपस्थिती नोंदवही ठेवावी व त्यामध्ये दररोज हजर असलेल्या कामगारांची नावे व संख्यांची नोंद घ्यावी ही सर्वस्वी जबाबदारी संबंधीत ठेकेदाराचीच राहील.

३.१.२७. मनुष्यबळ सेवा पुरवठादार ठेकेदाराने उपलब्ध करुन द्यावयाच्या मनुष्यबळावरील कामकाजाच्या देखरेखीची स्वतंत्र व्यवस्था त्यांच्या स्तरावरुन स्वत: करावी.

३.१.२८. मनुष्यबळ सेवा पुरवठादार ठेकेदाराकडून पुरविण्यात येणाऱ्या कामगारांची प्रकल्पातील कामाच्या दृष्टीने योग्यता विभागीय कृषि सहसंचालक यांच्या अध्यक्षतेखालील समिती मार्फत तपासून कामगारांची निवड करण्यात येईल. यासाठी ठेकेदाराने आवश्यक कामगार संख्येच्या १:३ (एक कामगारासाठी तीन कामगार) प्रमाणात कामगार तयार ठेवावेत. तसेच, कृषि विभागाच्या नियंत्रण/पर्यवेक्षण अधिकाऱ्याकडून विशिष्ठ कामगाराच्या कामाबाबत तक्रारी असल्यास सदर कामगाराचे बदल्यात व त्याच वेतनात दुसरा कामगार तात्काळ उपलब्ध करुन देणे आवश्यक राहील जेणेकरुन सेवा कामात व्यत्यय येणार नाही हे पहाणे ही पुर्णत: ठेकेदाराची जबाबदारी राहील.

३.१.२९. मनुष्यबळ सेवा पुरवठादार ठेकेदारांनी त्यांच्या कार्यालयात तक्रार नोंदवही ठेवावी. तक्रार नोंदवहीत नोंदविलेल्या तक्रारी, तसेच प्राप्त होणाऱ्या इतर तक्रारींची दखल ठेकेदाराने घेऊन त्यांचे वेळोवेळी कायदेशीरपणे निराकरण करणे व त्याचा अहवाल कामगार आयुक्त कार्यालय व संबंधीत विभागीय कृषि सहसंचालक कार्यालयास सादर करणे बंधनकारक राहील.

३.१.३०. मनुष्यबळ सेवा पुरवठादार ठेकेदाराकडून आवश्यक असणारे मनुष्यबळ पुरविण्यात यावे. आवश्यक संख्येपेक्षा कमी मनुष्यबळ उपलब्ध करुन दिल्यास पर्यायी व्यवस्थेसाठी शासनास जो काही खर्च येईल तो दंड म्हणून विभागीय कृषि सहसंचालक संबंधीत मनुष्यबळ सेवा पुरवठादार ठेकेदाराकडून वसूल करतील.

३.१.३१. मनुष्यबळ सेवा पुरवठादार ठेकेदारास स्वेच्छेने अथवा इतर कारणासाठी अचानकपणे कंत्राट रद्द करता येणार नाही. असे करावयाचे असल्यास किमान ६० दिवस अगोदर विहित नोटिसेद्वारे संबंधीत विभागीय कृषि सहसंचालक यांना कळविणे बंधनकारक राहील. याचे पालन न झाल्यास अशा परिस्थितीत कराराचा भंग केल्या प्रकरणी संबंधीत ठेकेदाराची अनामत रक्कम जप्त करण्यात येईल तसेच, दुसरी पर्यायी सोय होण्यासाठी इतर ठेकेदारास कंत्राट देईपर्यंत येणाऱ्या खर्चाची व इतर बाकी असल्यास त्याची वसूली संबंधीत मनुष्यबळ सेवा पुरवठादार ठेकेदाराकडून करण्यात येईल व आवश्यकतेनुरुप कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

३.१.३२. मनुष्यबळ सेवा पुरवठादार ठेकेदाराकडून अटी व शर्तीचा वेळोवळी भंग झाल्यास अथवा आवश्यक मनुष्यबळ पुरवठा करण्यास ते अपयशी ठरल्यास अशा परिस्थितीत विभागीय कृषि सहसंचालक

संबंधीतास त्वरीत करणे दाखवा नोटीसीद्वारे कळवतील तसेच, परिस्थितीनुरुप सदर ठेकेदाराचे कंत्राट समाप्त करुन अनामत रक्कम जप्त करतील व पुढील कायदेशीर कारवाई कामगार आयुक्त व विधी सल्लागाराच्या सल्ल्याने करण्यात येईल.

३.१.३३. मनुष्यबळ सेवा पुरवठादार ठेकेदाराकडून अथवा त्याने पुरविलेल्या एकुण मनुष्यबळाकडून शासकीय मालमत्तेचे नुकसान झाल्यास त्याची लवादामार्फत किंमत ठरविली जाईल या लवादामध्ये विभागीय कृषि सहसंचालक, विभागीय कृषि सहसंचालक कार्यालयातील अधिक्षक कृषि अधिकारी, दोन जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, विभागीय कृषि सहसंचालक कार्यालयातील लेखा अधिकारी व नुकसानी संबंधीत विशेषज्ञ यांचा समावेश असेल. संबधीत ठेकेदाराने ही रक्कम दोन महिन्यांच्या आत भरपाई करुन देण्याबाबत रु. १०० च्या अशासकीय मुद्रांकावर सक्षम अधिकाऱ्यापुढे शपथ पत्राद्वारे लिहून देणे आवश्यक आहे. याबाबत पुर्तता न झाल्यास प्रचलित कायद्यानुसार योग्य ती करवाई करण्यात येईल.

३.१.३४. मनुष्यबळ सेवा पुरवठादार ठेकेदाराकडून उपलब्ध करुन दिलेल्या कामगाराकडून कर्तव्यामध्ये दुर्लक्ष/कसूर झाल्यास तसेच त्यामुळे शासनाचे नुकसान झाल्यास संबंधीत मनुष्यबळ सेवा पुरवठादार ठेकेदार व विभागीय कृषि सहसंचालक यांच्या संयुक्त समितीच्या चौकशीनंतर संबधीत ठेकेदाराकडून नुकसान भरपाई वसूल करण्याचा अधिकार विभागीय कृषि सहसंचालक यांना राहील.

३.१.३५. निविदेमधील मनुष्यबळाच्या संख्येमध्ये तसेच, त्यांच्या कालावधीमध्ये आवश्यकतेनुसार सेवा पुरवठादार ठेकेदाराशी चर्चा करुन कमी अथवा जादा बदल होऊ शकतो.

३.१.३६. मनुष्यबळ सेवा पुरवठादार ठेकेदाराकडून पुरविण्यात येणारे मनुष्यबळ त्यांचे कार्य पार पाडण्यासाठी शारिरीक दृष्ट्या सक्षम असावे.

३.१.३७. शासन निर्णय रोजगार व स्वयंरोजगार विभाग क्रमांक रोस्वरो-२००२/प्र.क्र.२६७/रोस्वरो-१, दिनांक-१७ ऑगस्ट, २००२ तसेच, कृषि व पदुम विभागाचे शासन परिपत्रक क्रमांक रोजगार-१००४/प्र.क्र.७९/१३-अे, दिनांक-१८ ऑगस्ट, २००५, शासन निर्णय रोजगार व स्वयंरोजगार विभाग क्रमांक इएसई-२००३/प्र.क्र.१९१/रोस्वरो-१, दिनांक-१ फेब्रुवारी, २००६ नुसार बेरोजगारांच्या सेवा सहकारी संस्था/ लोकसेवा केंद्र यांना अनामत रक्कम व अनुभवाच्या अटीमध्ये सूट देण्यात येईल तथापि, त्यांना इतर अटी व शर्तींचे पालन करणे अनिवार्य राहील. (सदर बेरोजगारांच्या सेवा सहकारी संस्था/लोकसेवा केंद्र यांनी निविदे सोबत महाराष्ट्र राज्य सहाकारी संस्था अधिनियम, १९६० व नियम १९६१ नुसार नोंदणी प्रमाणपत्र जोडावे)

३.१.३८. विभागीय कृषि सहसंचालक हे कोणत्याही ठेकेदारास कंत्राट देण्यापूर्वी कोणतेही कारण न देता संबंधीत निविदाधारक किंवा निविदाधारकांच्या बाबतीत कोणतेही दायित्व अथवा जबाबदारी न स्विकारता कोणतीही निविदा स्विकारणे/नाकारणे/रद्द करणे किंवा सर्व निविदा नागरण्याचा अधिकार राखून ठेवत आहेत.

३.१.३९. मनुष्यबळ सेवा पुरवठादार ठेकेदारास वरील नियम व अटी मान्य असलेबाबत जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी तसेच, कृषि आयुक्तालयासाठी पुरवठा करावयाच्या कामगारांच्या बाबतीत विभागीय कृषि सहसंचालक, पुणे यांचेबरोबर रु. १०० च्या अशासकीय मुद्रांकावर सेवा करारनामा लिहून द्यावा लागेल.

३.२. **क्षेत्रिय सहाय्यक :** दरमहा रु.४६८०/- इतके मूळ मासिक वेतन, प्रवास भत्ता तसेच इतर सेवा कर व सेवा आकारासह एकुण रू.१०७२०/- (मनुष्यबळ सेवा पुरवठादार ठेकेदाराच्या सेवा आकारासह) वेतन प्रस्तावीत आहे.

**शैक्षणिक अर्हताः** १. उमेदवार किमान कृषि पदविकाधारक असावा.

२. स्थानिक तालुक्यात व उपविभागात राहणाऱ्या उमेदवारास प्राधान्य द्यावे.

३. वय २१ ते ४५ वर्षे

**सेवा कालावधी –** १५ जुलै, २०१६ ते ३१ जानेवारी, २०१७

३.३. **क्षेत्रिय सहाय्यकाचे कर्तव्य व जबाबदाऱ्या –**

१. क्षेत्रिय सहाय्यकांसाठी गाव व क्षेत्र निवडीसाठी देण्यात आलेल्या मार्गदर्शक सुचनांप्रमाणे पुर्व निश्चित क्षेत्रात केळी पिकाची लागवड करणाऱ्या शेतकऱ्यांची निवड करतील.

२. क्षेत्रिय सहाय्यक हे कृषि पर्यवेक्षकाच्या अधिनस्त काम करतील.

३. क्षेत्रिय सहाय्यकाने त्यांच्या कार्यक्षेत्रितील निवड केलेल्या केळी उत्पादक शेतकऱ्यांना केळीची लागवड करण्यापासून कंद प्रक्रिया, बागेची स्वच्छता, कीड व रोग नियंत्रणाकरीता करावयाच्या फवारण्या व त्याकरीता लागणाऱ्या औषधांचा पुरवठा इ. बाबत मार्गदर्शन करणे व त्याचे रेकॉर्ड ठेवणे त्यांच्यावर बंधनकारक राहील.

४. क्षेत्रिय सहाय्यक ने आठवडयातून एकदा म्हणजेच दर सोमवारी त्याच्या कार्यक्षेत्रातील केळी बागावरील कीड व रोगांचा अहवाल कृषि पर्यवेक्षक किंवा तालुका कृषि अधिकारी यांचेकडे सादर करतील.

५. क्षेत्रिय सहाय्यक व कृषि पर्यवेक्षक हे कृषि विद्यापीठ व कृषि विभागाकडून आयोजित केलेल्या प्रशिक्षणात दिलेल्या तांत्रिक निकषांनुसार कीड रोग सर्वेक्षणाचे व नियंत्रणाचे काम करतील.

६. क्षेत्रिय सहाय्यक हे ग्रामीण भागातच राहून केळी पिकांवरील कीड व रोगाकरीताची निरीक्षणे घेतील व त्याप्रमाणे शेतकऱ्यांना मार्गदर्शन करतील.

७. शेतामधील निरीक्षणे वेळीच घेण्यासाठी क्षेत्रिय सहाय्यकाजवळ प्रवासाची साधने व त्याच्या कार्यक्षेत्रामध्ये करावयाच्या प्रवासाबद्दलची माहिती व इतर बाबींचे चांगले ज्ञान असणे आवश्यक असून प्रवासाची आवड असावी.

४. **अंमलबजावणीसाठी करावयाची कार्यवाही**

**४.१ विभागीय स्तर :** विभागीय स्तरावरुन सदर पॅकेजची अंमलबजावणी व्यवस्थितपणे होत आहे याबाबतचे सनियंत्रण विभागीय कृषि सहसंचालक, नाशिक यांचेमार्फत करण्यात यावे, तसेच सलग २०० ते ४०० हेक्टरच्या एका केळी समूहास आवश्यकतेप्रमाणे १ क्षेत्रीय सहाय्यकाची आऊटसोर्सिंगद्वारे दि. १५/०७/२०१६ते ३१/०१/२०१७ पर्यंत नियुक्ती करण्यात यावी. क्षेत्रीय सहायक ही पदे पुर्णपणे आऊटसोर्सिंगद्वारे कंत्राटी पध्दतीने भरावयाची असून क्षेत्रीय सहायक हा किमान कृषि पदविका धारक असणे आवश्यक आहे. आऊटसोर्सिंगद्वारे नियुक्त केलेल्या क्षेत्रीय सहायकास रु. १०,७२०/- प्रति महिना याप्रमाणे वेतन अदा निश्चित करण्यात यावे.

जळगाव, धुळे व नंदुरबार जिल्ह्यांमध्ये लागणाऱ्या क्षेत्रीय सहायकांची नियुक्ती सेवा पुरवठादार संस्थेकडून आऊटसोर्सिंगद्वारे दि. १५/०७/२०१६ ते ३१/०१/२०१७ पर्यंत करण्यात यावी. जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी केळी पिकांचे समुहानुसार क्षेत्रीय सहायकांची मुख्यालये निश्चित करुन त्याची माहिती विभागीय कृषि सहसंचालक नाशिक यांना तातडीने सादर करावी. त्यानुसार विभागीय कृषि सहसंचालक नाशिक यांनी क्षेत्रीय सहायकांची जिल्हानिहाय समूहनिहाय (Clusterwise) नियुक्ती करुन संबंधित जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांना कळवावे.

**४.२ जिल्हास्तर :** जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी पॅकेज राबविण्यासाठी सलग १०० हेक्टर केळी क्षेत्राचे समूह तयार करावेत. त्याचप्रमाणे केळी संशोधन केंद्र व कृषि विद्यापीठाने तयार केलेल्या पॅकेजचे वेळापत्रक तयार करावे. शेतकऱ्यांची मानसिकता तयार करण्यासाठी व जनजागृती करण्यासाठी घडीपत्रिका, भित्तीपत्रके, माहितीपत्रके, पुस्तिका छपाई करुन त्यामध्ये प्रकल्पाची माहिती, राबविण्यात येणारे पॅकेज, करावयाची कार्यवाही याबाबतची माहिती नमुद करुन त्यास विविध प्रसार माध्यमांद्वारे प्रसिध्दी देण्यात यावी. त्याचप्रमाणे गावनिहाय प्रकल्प मोहिम राबविण्याच्या तारखा निश्चित करण्यात येऊन त्याप्रमाणे फवारणीचा कार्यक्रम राबवावा.

सदर योजनेअंतर्गत निवड केलेल्या क्षेत्रिय सहाय्यकांसाठी व क्षेत्रिय अधिकाऱ्यांसाठी माहे १५ जुलै, २०१६ पुर्वी प्रत्येक जिल्ह्यात प्रशिक्षण आयोजित करण्यात यावे. सदर प्रशिक्षणाकरीता कृषि विद्यापीठातील शास्त्रज्ञ, केळी संशोधन केंद्रातील शास्त्रज्ञ व कृषि विभागातील तज्ञ अधिकाऱ्यांना आमंत्रित करण्यात यावे.

सदर योजनेअंतर्गत केळी उत्पादक शेतकऱ्यांसाठी प्रत्येक जिल्ह्यात जनजागृती कार्यक्रमाअंतर्गत २ प्रशिक्षण वर्ग आयोजित करावे. पहिले प्रशिक्षण ऑगस्ट, २०१६ पुर्वी व दुसरे प्रशिक्षण ऑक्टोबर, २०१६ पुर्वी आयोजित

करावे. सदर प्रशिक्षणाकरीता राष्ट्रीय केळी संशोधन केंद्र, त्रिची, केळी संशोधन केंद्र, जळगाव, कृषि विद्यापीठातील शास्त्रज्ञ व कृषि विभागातील तज्ञ अधिकाऱ्यांना आमंत्रित करावे. तसेच सदर प्रशिक्षणाकरीता केळीची लागवड व कीड व रोग नियंत्रणाबाबत अनुसरावयाच्या कार्यपद्धतीबाबत मार्गदर्शक पूस्तिका तयार करुन शेतकऱ्यांना उपलब्ध करुन देण्यात द्यावी.

**५. पॅकेज अंतर्गत औषध मागणी**

प्रकल्प समूह पध्दतीने व सर्व केळी पिकाच्या क्षेत्रावर एकाच वेळी राबवावयाचा असल्याने पॅकेजप्रमाणे लागणाऱ्या जिल्हानिहाय औषधाची मागणी संबंधित जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी प्राधान्याने निश्चित करावी त्यानुसार जिल्हानिहाय मागणी आवश्यकतेनूसार टप्प्याटप्प्याने महाराष्ट्र कृषि उद्योग विकास महामंडळाकडे नोंदवून त्याची प्रत विभागीय कृषि सहसंचालक आणि कृषि आयुक्तालयास सादर करावी. पॅकेजअंतर्गत लागणाऱ्या औषधाचे दर हे कृषि विभागाने ठरविलेल्या दराप्रमाणेच राहतील. खरेदी केलेली किटकनाशके कोणत्याही परिस्थितीत विनावापर राहणार नाहीत याची दक्षता संबंधित जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी घ्यावी. पॅकेजअंतर्गत जो कार्यक्रम राबविण्यात येत आहे, त्याची फवारणीनिहाय नोंद करावी. त्यामध्ये प्रत्येक फवारणीची शेतकरी संख्या व त्यांचे क्षेत्र दर्शविण्यात यावे. तसेच फवारणीनिहाय वाटप केलेल्या औषधांची नावे व पुरवठा केलेली औषधे तसेच किंमत दर्शविण्यात यावी. याबाबतची नोंद नोंदवहीमध्ये करावी.

**पॅकेज राबविण्याबाबतची सविस्तर माहिती खालीलप्रमाणे**

१. सदर कार्यक्रम हा मागील वर्षीच्या पॅकेजप्रमाणे म्हणजेच रु. २५,६५७/- हे. या आर्थिक मर्यादेच्या अधिन राहून राबविण्यात यावा. सदरच्या योजनेंतर्गत औषधाचे वाटप मागील वर्षीप्रमाणेच प्रतिहेक्टरी पॅकेज खर्चाच्या ९० टक्के अनुदानावर करावे व १० टक्के रक्कम ही लाभार्थी हिस्सा म्हणून वसूल करण्यात यावा.
२. पॅकेज राबविण्यासाठी मोठ्या प्रमाणावर औषधे लागणार असून पॅकेजमध्ये दर्शविल्याप्रमाणे कंद उपचारासाठी लागणाऱ्या औषधाची मागणी तात्काळ महाराष्ट्र कृषि उद्योग विकास महामंडळाकडे जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी जळगाव, धुळे, नंदुरबार यांनी नोंदवावी व महमंडळाकडून औषध पुरवठा वेळेवर होईल याबाबतची दक्षता घ्यावी.
३. पॅकेज अंतर्गत लागणारी औषधे ही महाराष्ट्र कृषि उद्योग विकास महामंडळाने तालुकास्तरापर्यंत पोहोच करावयाची आहेत. तेथून शेतकरी समुह/गटाने औषधाचे ९० टक्के अनूदान वजा जाता १० टक्के हिस्साचा डिमांड ड्राफ्ट तालुका कृषि अधिकारी यांच्याकडे जमा करुन औषधाची उचल करावयाची आहे. त्यासाठीचे लागणारे परमिट तालुका कृषि अधिकारी यांनी शेतकरी समुह गटास उपलब्ध करुन द्यावे.
४. पॅकेजअंतर्गत जरी ७ फवारण्यांचा कार्यक्रम प्रस्तावीत केलेला असला तरी गरजेनुसार फवारण्या घेण्यात याव्यात. पॅकेजमध्ये नमूद केल्याप्रमाणे प्रथमतः ३ फवारण्यांचे नियोजन करण्यात येऊन पहिल्या फवारणीसाठी पॅकेजमध्ये दर्शविलेल्या मॅन्कोझेब या औषधाची पॅकिंगनिहाय मागणी जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी महाराष्ट्र कृषि उद्योग विकास महामंडळाकडे तात्काळ पाठवावी. त्यानंतर १५ दिवसांचे अंतराने दुस-या फवारणीसाठी लागणाऱ्या कार्बेनडेझीयम व तिसऱ्या फवारणीसाठी लागणाऱ्या प्रॉपिकोनॅझोल या औषधांची मागणी महाराष्ट्र कृषि उद्योग विकास महामंडळाकडे नोंदवावी.
५. औषधांची मागणी नोंदविताना औषधांची शिफारस, औषधे पोहोचविण्याचे ठिकाण, औषधांची एकूण आवश्यकता इत्यादी माहिती महामंडळाकडे कळवावी व त्याची प्रत विभागीय कृषि सहसंचालक नाशिक व कृषि आयुक्तालयास सादर यावी. औषधांसाठी ९० टक्के अनुदान असून १० टक्के लाभार्थी हिस्सा वसूल करुन औषधांचे वाटप करावे. प्राप्त होणाऱ्या प्रत्येक लॉटमधून औषधांचे नमुने घेऊन प्रयोगशाळेकडे पाठवावेत. जिल्ह्यास पुरवल्या जाणाऱ्या सर्व लॉटचे नमूने घेतल्याची जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी खात्री करावी. विशेषअंती नमुने प्रमाणित आढळून आला तरच त्याची देयके अदा करावीत. अप्रमाणित नमुन्यांच्या देयके अदा करु नयेत.

६. केळी पिकावरील करपा रोगाचे नियंत्रणासाठी महाराष्ट्र कृषि उद्योग विकास महामंडळाकडून लागणाऱ्या औषधांचा पुरवठा तात्काळ व वेळेत होणेबाबत विभागीय कृषि सहसंचालक, नाशिक व संबंधित जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी मंडळाकडे पाठपुरावा करावा. औषधे वेळेत पुरवठा करणे ही महाराष्ट्र कृषि उद्योग विकास मंडळ यांची जबाबदारी आहे. औषधे वेळेत पुरवठा न झाल्यास त्यांची देयके अदा केली जाणार नाहीत याची संबंधीत विभागीय कृषि सहसंचालक व जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी आदेशाच्या वेळी पुरवठा संस्थेला माहिती द्यावी व त्याप्रमाणे कार्यवाही करावी.

**६. मापनपुस्तिका :**

पॅकेजअंतर्गत राबविण्यात आलेल्या प्रत्येक बाबींची / कामांची नोंद, वापरलेल्या औषधांचा तपशील, खर्चाची माहिती मापनपुस्तिकेमध्ये नमूद करावी.

**७. मासिक प्रगती अहवाल :**

विभागीय कृषि सहसंचालक व जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी प्रकल्पांतर्गत राबविण्यात आलेल्या कामाचा भौतिक व आर्थिक मासिक प्रगती अहवाल प्रत्येक महिन्याच्या १० तारखेपर्यंत सोबतच्या **प्रपत्र क्र.४** मध्ये कृषि आयुक्तालयास न चुकता सादर करावा.

सदर योजनेअंतर्गत निवड केलेल्या केळी उत्पादक शेतकऱ्यांच्या शेतावर सर्व घटकांची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी. तसेच उपरोक्त दिलेल्या मार्गदर्शक सूचनांप्रमाणे कार्यक्रम त्वरीत राबविण्याबाबत आवश्यक ती कार्यवाही तात्काळ करण्यात यावी.

## प्रपत्र - १

## राष्ट्रीय कृषि विकास योजनेंतर्गत केळी पिकावरील सिगाटोका रोगनियंत्रण प्रकल्प जिल्हानिहाय कार्यक्रम सन २०१६-१७

| अ. क्र. | जिल्हा | बाब | पॅकेज राबविण्या साठीचे क्षेत्र (हेक्टर) | मूळ पॅकेजची प्रतिहेक्टरी किंमत (रुपये) | उपलब्ध करुन दिले जाणारे अनुदान (रु.लाखात) |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १. | जळगाव | फवारणी कार्यक्रम | ४४,३०२ | २५००० | ६२०.०० |
| | | जनजागृती कार्यक्रम | | ६५७ | ३२.४००५ |
| | | **एकूण (अ)** | | **२५६५७** | **६५२.४००५** |
| २ | धुळे | फवारणी कार्यक्रम | ३५० | २५००० | ३१.०० |
| | | जनजागृती कार्यक्रम | | ६५७ | ७.३७६५ |
| | | **एकूण (ब)** | | **२५६५७** | **३८.३७६५** |
| ३ | नंदुरबार | फवारणी कार्यक्रम | १९३७ | २५००० | ५६.०० |
| | | जनजागृती कार्यक्रम | | ६५७ | २०.७५३० |
| | | **एकूण (क)** | | **२५६५७** | **७६.७५३०** |
| **एकूण अ, ब, क** | | | **४६,५८९** | | **७६७.५३** |

**(फवारणी कार्यक्रम अंतर्गत कंत्राटी कर्मचाऱ्यांचे वेतन व ९० टक्के अनुदानावर पीक संरक्षण औषधांचा पुरवठा या बाबींचा समावेश आहे.)**

प्रपत्र -२

**Cost of Sigatoka disease management of Banana**

| Sr. No. | Particulars | Quantity in Kg/ L | Price per Kg/L | Total Cost per ha (in Rs.) |
|---|---|---|---|---|
| **A)** | **Field management** | | | |
| i) | Removal and disposal of diseased plant part | 10 person for 4 months@ Rs.150/- | | 6000 |
| | | | **Total -** | **6000** |
| **B)** | **Sucker treatment** | | | |
| i) | Acephet | 1.750 | 450 | 945 |
| ii) | Carbendazim | 1.5 | 410 | 615 |
| iii) | Application charges | 2 (persons) | 150 | 300 |
| | | | **Total -** | **1860** |
| **C)** | **Foliar spray** | | | |
| i) | Mancozeb (01 spray) | 3.75 | 354 | 1328 |
| ii) | Carbendanzim (1 spray) | 1.25 | 410 | 513 |
| iii) | Propiconzole (1 spray) | 1.900 | 1280 | 2432 |
| iv) | Carbendanzim + Mineral oil (02 spray) | 1.25+10.00 | 410/ 180 | 2313 |
| v) | Propiconzole + Mineral oil (02 spray) | 0.9+10.00 | 1280/ 180 | 4104 |
| vi) | Sticker | 10 | 225 | 2250 |
| | | | **Total -** | **12940** |
| **D)** | **Spraying charges( 07 spray) 04 person / per spray / ha. @ 150/-** | | | 4200 |
| | | | **Total -** | **4200** |
| **i)** | **Package Cost - Total (A+B+C+D)** | | | **25000** |
| **ii)** | **Campaign management** | | | **657** |
| | | | **Total** | **25657** |

## प्रपत्र-३

### जिल्हानिहाय जनजागृती कार्यक्रमांतर्गत प्रशिक्षण, शेतीशाळा कार्यक्रम

| अ.क्र. | जिल्हा | शेतकरी प्रशिक्षण (एक दिवस) रु. १५०/- प्रति दिवस प्रति शेतकरी | | शेतकरी प्रशिक्षण (दोन दिवस) रु. २५०/- प्रति दिवस प्रति शेतकरी | | शेतकरी शेती शाळा (रु. ३५,०००/- प्रति शेतीशाळा) | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | भौतिक (शेतकरी संख्या) | आर्थिक (रु.लाखात) | भौतिक (शेतकरी संख्या) | आर्थिक (रु.लाखात) | भौतिक (शेतकरी संख्या) | आर्थिक (रु.लाखात) |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १ | जळगाव | १०००० | १५.०० | ५०० | २.५० | २० | ७.०० |
| २ | धुळे | ३०० | ०.४५ | ५० | ०.२५ | ५ | १.७५ |
| ३ | नंदुरबार | ५०० | ०.७५ | १०० | ०.५० | ८ | २.८० |
| **एकुण** | | **१०८००** | **१६.२०** | **६५०** | **३.२५** | **३३** | **११.५५** |

प्रपत्र-४

## केळी पिकावरील सिगाटोका रोग नियंत्रणासाठी राबविण्यात आलेला कार्यक्रमाचा मासिक प्रगती अहवाल

| अ.क्र. | जिल्हा/ विभाग | प्रकल्पाअंतर्गत राबविण्यात येत असलेले केळी पिकाचे क्षेत्र (हेक्टर) | | मंजूर अनुदान (रु. लाखात) | केंद्र प्रक्रिया | | पाने काढणे | | पॅकेज अंतर्गत महामंडळाकडे औषध मागणी केल्याचा तपशिल | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | लक्ष्य | साध्य | | भौतिक साध्य (हेक्टर) | आर्थिक खर्च (रु. लाखात) | भौतिक साध्य (हेक्टर) | आर्थिक खर्च (रु. लाखात) | पत्र क्रमांक व दिनांक | औषधाचे नाव | औषधाचा तपशिल | | | | | |
| | | | | | | | | | | | मागणी | | पुरवठा | | वाटप | |
| | | | | | | | | | | | परिमाण | किंमत | परिमाण | किंमत | परिमाण | किंमत |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ | १६ | १७ |
| | | | | | | | | | | | | | | | | |

प्रपत्र -४

## केळी पिकावरील सिगाटोका रोग नियंत्रणासाठी राबविण्यात आलेला कार्यक्रमाचा मासिक प्रगती अहवाल

| अ.क्र. | जिल्हा/ विभाग | जनजागृती कार्यक्रमांतर्गत राबविण्यात आलेला एकुण कार्यक्रम (रु. लाखात) | | | फवारणी मजुरी खर्चासाठी झालेला खर्च (रु. लाखात) | | एकुण खर्च (७+९+१७+२०+२२) | झालेल्या खर्चाची विगतवारी | | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | तपशिल | मंजूर तरतूद | खर्च | मंजूर अनुदान | खर्च | | केंद्र शासन (राकृवियो) हिस्सा | राफअ हिस्सा | शेतकरी हिस्सा | |
| १ | २ | १८ | १९ | २० | २१ | २२ | २३ | २४ | २५ | २६ | २७ |
| | | | | | | | | | | | |

विभागीय कृषि सहसंचालक

जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी